वाचले:- १. मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०२४ इ. रोजी प्रसिध्द् केलेली शिपाई संवर्गातील उमेदवार यांची निवड व प्रतिक्षा यादी.

२. मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्रमांक प्रशासन ३६/७७, दि. १० फेब्रुवारी, २०२५ अन्वये शिपाई पदाचे निवड यादीमधील अनुक्रमांक १८ कडील श्री सचिन सर्जेराव जाधव हे त्यांचे नेमणूकीचे ठिकाणी शिपाई पदावर दिलेल्या मुदतीत रुजू न झालेमुळे निवड यादीमधून त्यांची नांवे वगळण्यात आलेबाबत...

३. मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्रमांक प्रशासन ३६/१४२, दि. २९ मार्च, २०२५ अन्वये शिपाई पदाचे निवड यादीमधील अनुक्रमांक २१ कडील श्री सुशांत विलास मनुगडे हे त्यांचे नेमणूकीचे ठिकाणी शिपाई पदावर दिलेल्या मुदतीत रुजू न झालेमुळे निवड यादीमधून त्यांची नांवे वगळण्यात आलेबाबत...

४. कनिष्ठ लिपिक पदाच्या निवड यादीमधील अनुक्रमांक १९ वरील श्री. सिद्राम वि. खाडे (शिपाई पदाची प्रतिक्षा यादी अनुक्रमांक ६) कनिष्ठ लिपिक, सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, जयसिंगपूर यांचे दिनांक ०४.०७.२०२५ इ. रोजीचे हमीपत्र.

५. कनिष्ठ लिपिक पदाच्या निवड यादीमधील अनुक्रमांक २८ वरील श्री. स्वरुप अ. लगारे (शिपाई पदाची प्रतिक्षा यादी अनुक्रमांक ७) कनिष्ठ लिपिक, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, (न्यायालय क्र. १) कोल्हापूर यांचे दिनांक ०४.०७.२०२५ इ. रोजीचे हमीपत्र.

६. प्रभारी प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचा दिनांक ०३ जुलै, २०२५ इ. रोजीचा कार्यालयीन अहवाल व त्यावरील निम्नस्वाक्षरीत यांचा आदेश.

**आदेश क्रमांक (प्रशासन) ३६/**३८०

वरील अनुषंगाने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर हे वर नमुद संदर्भ क्रमांक "१" नुसार **शिपाई** पदाचे प्रतिक्षा यादीमधील निवड झालेले उमेदवार यांचे प्रथम नेमणुकीसंदर्भात खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहेत :

| **अ. क्र.** | **शिपाई प्रतिक्षा यादीमधील अनुक्रमांक** | **उमेदवाराचे नाव व पत्ता** | **नेमणुकीचे ठिकाण** |
|---|---|---|---|
| १ | **५** | **स्वाती विजयकुमार गुगळे,** राहणार ४२ अ, यशवंत कॉलनी, दत्त मंदिर मागे, इचलकरंजी ४१६ ११५. | जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर येथे श्री. गणेश सी. जाधव, शिपाई यांचे पदोन्नतीने बदली झालेने. |

.......२/-

| अ. क्र. | शिपाई प्रतिक्षा यादीमधील अनुक्रमांक | उमेदवाराचे नाव व पत्ता | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| २ | ८ | **अजय संजय इंद्रुलकर,** राहणार सोनारवाडी, ता. भुदरगड, जिल्हा कोल्हापूर. ४१६ २०९. | जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर येथे श्री. गुरुनाथ एन. पाटील, शिपाई यांचे पदोन्नतीने बदली झालेने. |

वर नमुद उमेदवार यांची नेमणुक संबंधीत पदावर तात्पुरते / तदर्थ स्वरुपात करणेत येत आहे. उपरोक्त उमेदवारांची वेतननिश्चिती एस-१, वेतनबॅण्ड रक्कम रुपये १५,०००-४७,६०० या सुधारीत वेतन संरचनेत रुपये १५,०००/- या मुळ वेतनावर निश्चित करणेत येत आहे.

वर नमुद उमेदवार यांनी यासोबत जोडणेत आलेला विहीत साक्षांकन नमुना भरुन कार्यालय प्रमुख यांचेमार्फत या कार्यालयाकडे तात्काळ पाठवून देणेचा आहे.

उपरोक्त नमुन्यामध्ये उमेदवार यांनी आधार ओळखपत्र क्रमांक, पॅन कार्ड क्रमांक तसेच उमेदवारांच्या कुटुंबातील सदस्य परदेशात अध्ययन करीत असल्यास अथवा राहत असलेस त्याबाबतची माहिती समाविष्ट करणे अनिवार्य राहील.

**उपरोक्त उमेदवार यांनी दिनांक ०७ जुलै, २०२५ इ. रोजी अगर तेथून पूढे ०४ दिवसांत त्यांचे नेमणुकीचे ठिकाणी संबंधीत न्यायालयात हजर राहावे अन्यथा त्यांची नेमणुक तदर्थ स्वरुपाची असलेने ती आपोआप रद्द होईल आणि शिपाई पदाचे प्रतिक्षा यादीमधून त्यांचे नाव कमी करणेत येईल याची नोंद घ्यावी.**

उपरोक्त उमेदवार यांना कामावर रुजू झालेनंतर सदर कार्यालयीन अटी व शर्तींचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र व एकनिष्ठतेचे शपथपत्र द्यावे लागेल. तसेच त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल व वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य असेल. जर सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर या कार्यालयास १ महिन्याची आगाऊ लेखी सुचना दिली पाहिजे, किंवा तसे न करता राजीनामा दिलेस १ महिन्याच्या लेखी सुचनेऐवजी १ महिन्याचे वेतना इतके रोख रक्कम (वेतन संरचनेतील (Matrix) वेतन) या कार्यालयात जमा केली पाहिजे.

.......३/-

उमेदवारांनी नेमणुकीच्या ठिकाणी हजर होताना त्यांचा स्वतःचा मुळ फोटो असलेले ओळखपत्र ( पॅन कार्ड, ड्रायव्हींग लायसेन्स, आधार कार्ड इ. यापैकी एक) यासह हजर व्हावे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/ सेवा-४, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ आणि शासन निर्णय क्रमांक अंनियो १००७/१८/ सेवा-४, दिनांक ०७ जुलै, २००७ नुसार असे सुचित करणेत येते की, "१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल मात्र सद्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही."

| | | |
|---|---|---|
| जिल्हा व सत्र न्यायालय, | { } | ( कविता बि. अग्रवाल ) |
| कोल्हापूर ४१६ ००६. | { } | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, |
| दिनांक : ०५ /०७/२०२५ | { } | कोल्हापूर |

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित :-**

**१)** अधिक्षक, (वित्त / प्रशासन विभाग) जिल्हा व सत्र न्यायालय, **कोल्हापूर**

**प्रत माहितीकरीता व पुढील कार्यवाहीकरीता ईमेलद्वारे रवाना :-**

**१)** **स्वाती विजयकुमार गुगळे,** राहणार ४२ अ, यशवंत कॉलनी, दत्त मंदिरा मागे, इचलकरंजी ४१६ ११५. (swati.gugale15@gmail.com)

**२)** **अजय संजय इंदुलकर,** राहणार सोनारवाडी, ता. भुदरगड, जिल्हा कोल्हापूर. ४१६ २०९. (ajay.indulkar8@gmail.com)

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
कोल्हापूर